गोपनिय/त्वरित

अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर.
ईमेल-senag@mahapwd.com
website : www.mahapwd.com
☎ 2560409.

क्रमांक:- का.३/प्रलि(१)/वनवि/ २२४ /२००५

दिनांक १२/ ६/२००५

प्रति,

विभागीय आयुक्त
नागपूर

विषय :- नागपूर जिल्हयातील हिंगणा वनक्षेत्रात वनविभागाने बांधलेल्या रस्त्याच्या बांधकामात भ्रष्टाचाराबाबत.
विभागीय चौकशीसाठी अतिप्रदानाची रक्कम निश्चित करण्याबाबत.

संदर्भ :- आपले अ.शा. पत्र क्रमांक रोहयो/अका-२/कावि ७४८/२००५ दि. ६.४.२००५.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये, वन विभाग, नागपूर द्वारे रोहयो अंतर्गत हिगणा परिक्षेत्रात खालील कामाचे.

| | | |
|---|---|---|
| १) | कान्होली बारा-माथणी रस्ता भाग-१ | ०/० ते ३/०० लांबी ३ कि.मी. |
| २) | कान्होली बारा-माथणी रस्ता भाग-२ | ३/०० ते ४/६५० लांबी १.६५ कि.मी. |
| ३) | माथणी-कोकर्डी रस्त्याचे बांधकाम | ०/०० ते १/९२० लांबी १.९२ कि.मी. |

दोषारोपपत्रे देण्यासाठी वरील कामाच्या अतिप्रदानाची रक्कम कळविण्याचे निर्देश देण्यांत आले होते.

शासन नियोजन विभाग परिपत्रक क्रमांक रोहयो/१२०३/प्र-४५/रोहयो-२ दिनांक २८/८/२००३ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार वरील अतिप्रदान कामाची संयुक्त मोजमाप घेण्यासाठी कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र.३, नागपूर व त्यांच्या विभागांतर्गत कार्यरत असलेल्या उपविभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग, हिंगणा तसेच कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र.३, नागपूर हयांचे कार्यक्षेत्राबाहेरील, उपविभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग, कळमेश्वर हयांची नियुक्ती करण्यांत आली होती.

तसेच या कार्यालयाचे गोपनिय पत्र क्रमांक का.३/प्रलि(१)/८४/चौ.व.वि./२००५ दिनांक १७.३.२००५ अन्व्ये सदर कामाच्या संयुक्त मोजणी करण्याकरिता सदर काम ज्या कार्यान्वयीत यंत्रणेच्या अखत्यारित असेल, त्या यंत्रणेच्या वरिष्ठ अधिकारी हयांना संयुक्त मोजमाप घेतलेल्या संयुक्त मोजणीत प्रत्येक कामनिहाय तपासणी करण्याकरिता नियुक्ती करून त्यांना दिनांक २९.३.२००५ रोजी ११.०० वाजता उपअभियंता, सा.बां. उपविभाग, हिंगणा येथे उपस्थित राहण्याकरिता निर्देश देण्यांत यावे. याकरिता विनंती करण्यांत आली होती.

तसेच हया कार्यालयाचे गो. पत्र क्रमांक का.३/प्रलि(१)/चौ/व.वि./८५/२००५ दिनांक १७.३.२००५ अन्वये खालील अधिकारी हयांना नोटीस बजावण्यांत आली होती.

१) श्री के.एस.डांगरे, सहा. वनसंरक्षक (जेवास)
चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर

२) श्री आर.एन.रॉय, सहा. संचालक (कोकण रिजन)
सामाजिक वनिकरण, कोपरी, ठाणे

३) श्री डी.पी. सदावर्ती, उपविभागीय वन अधिकारी
गोंदिया वनविभाग, गोंदिया.

वरिल अधिकारी हयांना नोटीस वजावून दिनांक २९.३.२००५ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग, हिंगणा येथे उपस्थित राहण्याबाबत कळविण्यांत आले होते.

परंतू कोणीही अधिकारी संयुक्त मोजणी करिता हजर नोव्हते असे उपविभागीय अधिकारी, सा.बां. उपविभाग, हिंगणा हयांचे पत्र क्रमांक १५२/हिंगणा दिनांक २९.३.२००५ अन्वये हया कार्यालयास कळविले होते.

परत हया कार्यालयाचे गोपनिय पत्र क्रमांक का.३/प्रलि(१)/चौ/व.वि./९६/२००५ दि. ३०.३.२००५ अन्व्ये प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र, नागपूर हयांच्या द्वारे वरिल अधिकारी हयांना नोटीस वजावण्यांत आले असून त्यांना दिनांक १२.४.२००५ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहण्यास कळविण्यांत आले होते.

सदर कामाच्या संयुक्त मोजणी करण्यात श्री के.एस. डोंगरे, सहा. वनसंरक्षक (जेवास) चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर हे दिनांक १२.४.२००५ रोजी उपस्थित होते.

दिनांक १२.४.२००५ रोजी श्री जे.पी. भगत, उप अभियंता, सा.बां. उपविभाग, हिंगणा, श्री ए.व्ही. लढे, उपविभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग, कळमेश्वर, श्री हनुमान महादेवराव ठोंडरे, सरपंच ग्रामपंचायत, कान्होलीबारा, श्री आर.एस. चठ्ठा, सहा. अभियंता श्रेणी-२, सा.बां. उपविभाग, कळमेश्वर, व श्री व्ही.एस. दुधलकर, शाखा अभियंता, सा.बां. उपविभाग, हिंगणा, श्री के.एस. डोंगरे, सहा. वनसंरक्षक (जेवास) चंद्रपूर हे प्रत्यक्ष झालेल्या कामाच्या मौक्यावर उपस्थित राहून प्रत्यक्षात झालेल्या कामाचे मोजमाप घेऊन प्रथमता कोऱ्या कागदावर घेतलेले मोजमाप नोंदविण्यांत आले होते व त्यावर उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या आहे.

त्यानंतर मोजमाप पुस्तक क्रमांक८६७ मध्ये पृष्ठ क्रमांक १ ते १४ मध्ये मोजमाप नोंदविले आहे. त्यावर श्री ए.व्ही. लढे,उपअभियंता, सा.बां. उपविभाग, कळमेश्वर व श्री जे.पी. भगत, उपअभियंता, सा.बां. उपविभाग, हिंगणा आणि श्री हनुमान महादेवराव ठोंडरे, सरपंच, ग्रामपंचायत, कान्होलीबारा हयांनी स्वाक्षरी केली आहे. परंतू श्री के.एस. डोंगरे, सहा. वनसंरक्षक हे मोजमाप पुस्तिकेवर स्वाक्षरी करण्याकरिता हजर झाले नाही. तसेच त्यांच्या दुरध्वनीवरून व भ्रमणध्वनी वर संपर्क साधण्याच्या बरेचदा उपअभियंता, सा.बां. उपविभाग, हिंगणा हयांनी प्रयत्न केला परंतू त्यांना प्रतिसादर मिळाला नाही. उपविभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग, हिंगणा हयांनी त्यांचे पत्र क्रमांक २३८ दि. १३.५.२००५ अन्वये

...या कार्यालयीन पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने पत्र पाठविण्यांत आले होते. सदर ... वर नाहा. सबब परत असे लिहून सा.बां. उपविभाग, हिंगणा कार्यालयास परत आले होते.

श्री आर.एन. रॉय, सहसंचालक कोकण सामाजिक वनी... ...नी त्यांचे पत्र क्रमांक ब/कोसावव/कक्ष-११/८८/सन २००५-०६ दिनांक ३१.३.२००५ अन्वये ह्या कार्यालयास असे कळविले की, सदर मोजमाप करणे कामी प्रत्यक्ष माझी उपस्थिती आवश्यक नाही. असे कळविले होते (सोबत पत्राची प्रत जोडली आहे.)

संयुक्त मोजमाप घेतले असता कामावर खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | कान्होलीबारा-माथणी रस्ता भाग-१ (०/०० ते ३/०० कि.मी.) | रू. १२,३७,९६५/- |
| २) | कान्होलीबारा-माथणी रस्ता भाग-२ (३/०० ते ४/६५० कि.मी.) | रू. ८,५०,६५४/- |
| ३) | माथणी-कोकर्डी रस्त्याचे बांधकाम भाग-३ (०/०० ते १/९२० कि.मी.) | रू. ९,८५,८१४/- |
| | **एकूण खर्च** | **रू. ३०,७४,४३३/-** |

वरिल तिन्ही भागामध्ये एकूण खर्च रू. ३०,७४,४३३/- एवढा झाला व या कामावरील किरकोळ खर्च रू. १,२२,०७६/- एवढा धरून आहे. कामावर एकूण खर्च झालेल्या रक्कमेतून किरकोळ खर्च वजा केल्यास रू. ३०,७४,४३३ (-) रू. १,२२,०७६ = रू. २९,५२,३५७/- एवढा खर्च कामावर झालेला आहे.

प्रत्यक्षात झालेल्या कामाचे मोजमाप केले असता खालील प्रमाणे कामाची मुल्यांकित किंमत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | कान्होलीबारा-माथणी रस्ता भाग-१ (०/०० ते ३/०० कि.मी.) | रू. ५,१५,९७८/- |
| २) | कान्होलीबारा-माथणी रस्ता भाग-२ (३/०० ते ४/६५० कि.मी.) | रू. २,७१,०५९/- |
| ३) | माथणी-कोकर्डी रस्त्याचे बांधकाम भाग-३ (०/०० ते १/९२० कि.मी.) | रू. २,६५,४५७/- |

| | | |
|---|---|---|
| | **प्रत्यक्ष मोजणीच्या वेळी मुल्यांकित किंमत** | **रू. १०,५२,४९४/-** |
| १) | भाग-१ , भाग-२, भाग-३ वरील कामावर झालेला प्रत्यक्ष खर्च | रू. २९,५२,३५७/- |
| २) | प्रत्यक्ष चौकशीच्या वेळी घेतलेल्या मोजमापाची मुल्यांकित किंमत | रू. (-) १०,५२,४९४/- |
| ३) | तफावतीची किंमत | रू. १८,९९,८६३/- |

संयुक्त मोजमापे घेतली असता रू. १८,९९,८६३/- एवढया रक्कमेचे अतिप्रदान झाल्याचे दिसून येते.

सहपत्र :- १) चौकशी अहवाल (मुळ)
२) मोजमाप पुस्तक क्र. ८६७ मुळ

अधिक्षक अभियंता
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
नागपूर